$$\Rightarrow \quad \frac{d^2y}{dx^2} + 9\,y = 0$$

8) $\mathbf{y = a\cos(x + b)}$ याचे विकलक समीकरण (Diff. Eqn.) तयार करा.

**उत्तर:** दिलेले: $y = a\cos(x + b) \cdots\cdots\cdots\cdots\cdots\cdots (i)$

समीकरण (i) मध्ये दोन स्थिरांक आहे. म्हणून दोन वेळा विकलन (differentiate) करू.

$\therefore \quad \frac{dy}{dx} = -a\sin(x + b)$

$\Rightarrow \quad \frac{d^2y}{dx^2} = -a\cos(x + b)$

$\Rightarrow \quad \frac{d^2y}{dx^2} = -y$ समीकरण (i) वरून

$\Rightarrow \quad \frac{d^2y}{dx^2} + y = 0$

## सराव प्रश्न संच

**1)** खालील विकलक समीकरणांची कोटिका(Order) आणि कोटि (Degree)शोधा:

a) $\frac{d^2y}{dx^2} + 3\left(\frac{dy}{dx}\right)^3 = 5$

b) $\left(\frac{d^2y}{dx^2}\right)^2 - \left(\frac{dy}{dx}\right)^4 + y = 0$

c) $\frac{d^2y}{dx^2} + \sqrt{1 + \frac{dy}{dx}} = 0$

d) $\left(\frac{d^2y}{dx^2}\right)^2 = \left[k + \left(\frac{dy}{dx}\right)^2\right]^3$

2) खालील समीकरणांवरून विकलक समीकरण तयार करा.

a) $x^2 = 4ay$

b) $y = ax^2$

c) $y(1 + x^2) = a + x$

d) $y = A\cos 4x + B\sin 4x$

e) $y = Ae^{2x} + Be^{-2x}$

f) $y = Ae^{x} + Be^{-2x}$

g) $y = Ae^{2x} + Be^{-x}$

h) $y = mx + c$

i) $y = ax^2 + b$

j) $\frac{x}{a} + \frac{y}{b} = 1$

## १.३ विकलक समीकरणाचे निराकरण (Solution of a differential equation): (सलूशन ऑफ़ डिफरेंशियल इक्वेशन)

- दिलेल्या विकलक समीकरणाचे समाधान पूर्ण करणाऱ्या समीकरणाला त्याचे उकल म्हणतात.
- प्रथम कोटिका आणि कोटि असलेले सामान्य विकलक समीकरण (Ordinary Diff. Eqn. of first order & first degree) $M\,dx + N\,dy = 0$ अश्या स्वरुपात असते. M आणि N हे चल $x, y$ चे फल (functions) आहेत.
- चल परिवर्तन रूप: (Variable separable form) (वेरिएबल सेपरेबल फॉर्म)
- $f(x)dx + g(y)dy = 0$ अश्या स्वरुपात असलेल्या समीकरणाला चल परिवर्तन रूप (Variable separable form) असे म्हणतात आणि त्याचे उकल (solution) खालीलप्रमाणे आहे.

$$\int f(x)dx + \int g(y)dy = c$$

## सोडविलेले उदाहरणे

**1)** सोडवा : $\mathbf{x\,dy - y\,dx = 0}$

उत्तर: दिलेले: $x\,dy - y\,dx = 0$

$\Rightarrow \quad x\,dy = y\,dx$

$\Rightarrow \quad \frac{dy}{y} = \frac{dx}{x} \cdots\cdots\cdots\cdots$ चल परिवर्तन रूप (variable - separable form).

संकलन केल्यावर (Integrating),

$$\int \frac{dy}{y} = \int \frac{dx}{x} + c$$

$\Rightarrow \quad \log y = \log x + c$

**2)** सोडवा : $\mathbf{e^y \frac{dy}{dx} = x^3}$

उत्तर: दिलेले: $e^y \frac{dy}{dx} = x^3$

$\Rightarrow \quad e^y dy = x^3 dx \cdots\cdots\cdots\cdots$ चल परिवर्तन रूप

संकलन केल्यावर ,

$$\int e^y dy = \int x^3 dx + c$$

$\Rightarrow \quad e^y = \frac{x^4}{4} + C$

**3)** सोडवा : $\mathbf{\frac{dy}{dx} = \frac{\sqrt{1-y^2}}{\sqrt{1-x^2}}}$

उत्तर: दिलेले: $\frac{dy}{dx} = \frac{\sqrt{1-y^2}}{\sqrt{1-x^2}}$

$\Rightarrow \quad \frac{dy}{\sqrt{1-y^2}} = \frac{dx}{\sqrt{1-x^2}} \cdots\cdots\cdots\cdots$ चल परिवर्तन रूप.

संकलन केल्यावर,

$$\int \frac{dy}{\sqrt{1-y^2}} = \int \frac{dx}{\sqrt{1-x^2}} + c$$

$\Rightarrow \quad \sin^{-1}y = \sin^{-1}x + c$

**4)** सोडवा : $\mathbf{(1+x^2)dy+(1+y^2)dx=0}$

उत्तर: दिलेले: $(1+x^2)dy+(1+y^2)dx=0$

$$\Rightarrow \quad (1+x^2)dy=-(1+y^2)dx=0$$

$$\Rightarrow \quad \frac{dy}{1+y^2}=-\frac{dx}{1+x^2}$$

$\Rightarrow \quad \dfrac{dy}{1+y^2}+\dfrac{dx}{1+x^2}$ ………… चल परिवर्तन रुप (variable - separable form).

संकलन केल्यावर (Integrating),

$$\int\frac{dy}{1+y^2}+\int\frac{dx}{1+x^2}=c$$

$$\Rightarrow \quad \tan^{-1}y+\tan^{-1}x=c$$

**5)** सोडवा : $\mathbf{\frac{dy}{dx}=e^{2x-3y}+4x^2e^{-3y}}$

उत्तर: दिलेले: $\dfrac{dy}{dx}=e^{2x-3y}+4x^2e^{-3y}$

$$\Rightarrow \quad \frac{dy}{dx}=e^{2x}e^{-3y}+4x^2e^{-3y}$$

$$\Rightarrow \quad \frac{dy}{dx}=e^{-3y}\left(e^{2x}+4x^2\right)$$

$$\Rightarrow \quad \frac{dy}{e^{-3y}}=\left(e^{2x}+4x^2\right)dx$$

$\Rightarrow \quad e^{3y}dy=(e^{2x}+4x^2)dx$ ………चल परिवर्तन रुप

संकलन केल्यावर,

$$\therefore \quad \int e^{3y}dy=\int(e^{2x}+4x^2)dx+c$$

$$\Rightarrow \quad \int e^{3y}dy=\int e^{2x}dx+\int 4x^2dx+c$$

$$\Rightarrow \quad \frac{e^{3y}}{3}=\frac{e^{2x}}{2}+4\frac{x^3}{3}+c$$

$$\Rightarrow \quad \frac{e^{3y}}{3}=\frac{e^{2x}}{2}+\frac{4x^3}{3}+c$$

**6) सोडवा : $\sec^2 x \tan y\, dx + \sec^2 y \tan x\, dy = 0$ if $x = \frac{\pi}{4}$ when $y = \frac{\pi}{4}$**

**उत्तर:** दिलेले: $\sec^2 x \tan y\, dx + \sec^2 y \tan x\, dy = 0$

$\Rightarrow \quad \sec^2 x \tan y\, dx = -\sec^2 y \tan x\, dy$

$\Rightarrow \quad \frac{\sec^2 x}{\tan x} dx = -\frac{\sec^2 y}{\tan y} dy$ ………चल परिवर्तन रूप .

संकलन केल्यावर,

$\therefore \quad \int \frac{\sec^2 x}{\tan x}\, dx = \int \frac{\sec^2 y}{\tan y} dy + c$

$\Rightarrow \quad \log(\tan x) = -\log(\tan y) + c$

$\Rightarrow \quad \log(\tan x) + \log(\tan y) = c$ ………… (i)

आता $x = \frac{\pi}{4}$ आणि $y = \frac{\pi}{4}$

$\Rightarrow \quad \log\left(\tan\frac{\pi}{4}\right) + \log\left(\tan\frac{\pi}{4}\right) = c$

$\Rightarrow \quad \log(1) + \log(1) = c$

$\Rightarrow \quad 0 + 0 = c$

$\Rightarrow \quad c = 0$

समीकरण (i) मध्ये $c = 0$ टाकू या.

$\log(\tan x) + \log(\tan y) = 0$

## सराव प्रश्न संच

**प्रश्न:** खालील विकलक समीकरणे सोडवा:

1) $\sin x \sin y \, dy - \cos x \cos y \, dx = 0$

2) $(1 + x^3)dy - x^2 y dx = 0$

3) $(1 + x^2)dy - x^2 y dx = 0$

4) $x(1 + y^2)dx + y(1 + x^2)dy = 0$

5) $e^y \frac{dy}{dx} = x^2$

6) $\frac{dy}{dx} = e^{2x+3y}$

7) $\frac{dy}{dx} = e^{x-y} + x^2 e^{-y}$

8) $(y + x^2 y)\frac{dy}{dx} - (3x + xy^2) = 0$

9) $\frac{dy}{dx} = \frac{1 + y^2}{1 + x^2}$

10) $\frac{dy}{dx} = \cos x \tan y$

A) रेखीय विकलक समीकरण (Linear Differential Equation): (लीनियर डिफरेंशियल इक्वेशन)

प्रथम कोटिका आणि प्रथम कोटि (first order & first degree) असलेले रेखीय विकलक समीकरणाचे (Linear Diff. Eqn.) सामान्य स्वरुप (General Form) $\frac{dy}{dx} + Py = Q$ असे आहे, जिथे P आणि Q हे x चे फल किंवा स्थिर आहेत.

रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे आहे.

$$y \cdot (I.F.) = \int Q \cdot (I.F.)dx + c$$

इथे $I.F. =$ Integrating Factor (संकलन गुणक) $= e^{\int pdx}$

---

## सोडविलेले उदाहरणे

**1)** संकलन गुणक(I.F.) शोधा $\mathbf{\frac{dy}{dx} + y\sec x = \tan x}$

उत्तर: दिलेले: $\frac{dy}{dx} + y\sec x = \tan x$

इथे $P = \sec x$

$\therefore \quad I.F. = e^{\int pdx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\int \sec x dx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\log(\sec x + \tan x)}$

$\Rightarrow \quad I.F. = \sec x + \tan x$

**2)** संकलन गुणक शोधा $\mathbf{(1 + x^2)\frac{dy}{dx} + y = e^{\tan^{-1} x}}$

उत्तर: दिलेले: $(1 + x^2)\frac{dy}{dx} + y = e^{\tan^{-1} x}$

दोन्ही बाजूंना $(1 + x^2)$ ने भाग देऊ या,

$\Rightarrow \quad \frac{dy}{dx} + \frac{y}{1 + x^2} = \frac{e^{\tan^{-1} x}}{1 + x^2}$ रेखीय विकलक समीकरण

इथे $P = \frac{1}{1+x^2}$

$\therefore$ $I.F. = e^{\int p dx}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\int \frac{1}{1+x^2} dx}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\tan^{-1} x}$

**3) सोडवा : $\mathbf{x\frac{dy}{dx} - y = x^2}$**

उत्तर: दिलेले: $x\frac{dy}{dx} - y = x^2$

दोन्ही बाजूंना x ने भाग देऊ या,

$\frac{dy}{dx} - \frac{y}{x} = x$ रेखीय विकलक समीकरण

इथे $P = \frac{-1}{x}$ आणि $Q = x$

$\therefore$ $I.F. = e^{\int p dx}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\int \frac{-1}{x} dx}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{-\log(x)}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\log(x^{-1})}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\log\left(\frac{1}{x}\right)}$

$\Rightarrow$ $I.F. = \frac{1}{x}$

$\therefore$ रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे

$$y \cdot (I.F.) = \int Q \cdot (I.F.) dx + c$$

$\Rightarrow$ $y \cdot \frac{1}{x} = \int x \cdot \frac{1}{x} dx + c$

$\Rightarrow$ $\frac{y}{x} = \int dx + c$

$\Rightarrow$ $\frac{y}{x} = x + c$

**4)** सोडवा : $\mathbf{(x+1)\frac{dy}{dx} - y = e^x(x+1)^2}$

उत्तर: दिलेले: $(x+1)\frac{dy}{dx} - y = e^x(x+1)^2$

दोन्ही बाजूंना $(x+1)$ ने भाग देऊ या,

$$\frac{dy}{dx} - \frac{1}{x+1}y = e^x(x+1)$$ रेखीय विकलक समीकरण

इथे $P = \frac{-1}{x+1}$ आणि $Q = e^x(x+1)$

$\therefore$ $I.F. = e^{\int p dx}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\int \frac{-1}{x+1} dx}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{-\log(x+1)}$

$\Rightarrow$ $I.F. = e^{\log\left(\frac{1}{x+1}\right)}$

$\Rightarrow$ $I.F. = \frac{1}{x+1}$

$\therefore$ रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे

$$y \cdot (I.F.) = \int Q \cdot (I.F.)dx + c$$

$\Rightarrow$ $y \cdot \frac{1}{x+1} = \int e^x(x+1) \cdot \frac{1}{x+1} dx + c$

$\Rightarrow$ $\frac{y}{x+1} = \int e^x dx + c$

$\Rightarrow$ $\frac{y}{x+1} = e^x + c$

**5)** सोडवा : $\mathbf{x\frac{dy}{dx} + y = x^3}$

उत्तर: दिलेले: $x\frac{dy}{dx} + y = x^3$

दोन्ही बाजूंना x ने भाग देऊ या,

$$\frac{dy}{dx} + \frac{y}{x} = x^2$$ रेखीय विकलक समीकरण

इथे $P = \frac{1}{x}$ आणि $Q = x^2$

$\therefore \quad I.F. = e^{\int p dx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\int \frac{1}{x} dx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\log(x)}$

$\Rightarrow \quad I.F. = x$

∴ रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे

$$y \cdot (I.F.) = \int Q \cdot (I.F.) dx + c$$

$\Rightarrow \quad y \cdot x = \int x^2 \cdot x \, dx + c$

$\Rightarrow \quad xy = \int x^3 dx + c$

$\Rightarrow \quad xy = \frac{x^4}{4} + c$

**6)** सोडवा : $\mathbf{\sin x \frac{dy}{dx} + y\cos x = x\sin x}$

उत्तर: दिलेले: $\sin x \frac{dy}{dx} + y\cos x = x\sin x$

दोन्ही बाजूंना $\sin x$ ने भाग देऊ या,

$$\frac{dy}{dx} + \frac{\cos x}{\sin x} y = \frac{x \sin x}{\sin x}$$

$\Rightarrow \quad \frac{dy}{dx} + \cot x \; y = x$ रेखीय विकलक समीकरण

इथे $P = \cot x$ आणि $Q = x$

$\therefore \quad I.F. = e^{\int p dx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\int \cot x \, dx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\log(\sin x)}$

$\Rightarrow \quad I.F. = \sin x$

∴ रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे

$$y \cdot (\text{I. F.}) = \int Q \cdot (\text{I. F.})dx + c$$

$$\Rightarrow \quad y \cdot \sin x = \int x \cdot \sin x \ dx + c$$

$$\Rightarrow \quad y \cdot \sin x = x \int \sin x dx - \int \left\{\frac{d}{dx}(x) \cdot \int \sin x \, dx\right\} dx + c$$

$$\Rightarrow \quad y \cdot \sin x = x(-\cos x) - \int 1 \cdot (-\cos x)dx + c$$

$$\Rightarrow \quad y \cdot \sin x = -x\cos x + \sin x + c$$

---

## सराव प्रश्न संच

**प्रश्न:** खालील विकलक समीकरणे सोडवा:

1) $x\frac{dy}{dx} + y = x^2$

2) $x\frac{dy}{dx} + y = x^2e^x$

3) $(1 + x^2)\frac{dy}{dx} + y = e^{\tan^{-1}x}$

4) $\frac{dy}{dx} + y = e^{-x}$

5) $\frac{dy}{dx} + y = x^2$

6) $x\frac{dy}{dx} + y = x^2e^x$

7) $\frac{dy}{dx} + y\cot x = \cos x$

8) $\frac{dy}{dx} + y\cot x = \mathrm{cosec}\, x$

9 $\frac{dy}{dx} + 2xy = e^X$

10 $\frac{dy}{dx} + 3y = 4\ cosx$

11 $\frac{dy}{dx} + x^2y = x$

12 $\frac{dy}{dx} + xy = cosx$

13 $\frac{dy}{dx} + \frac{1}{x}y = \frac{1}{x^2}$

14 $\frac{dy}{dx} + lnx\ y = 1$

15 $\frac{dy}{dx} + \frac{1}{cosx}y = tanx$

16 $\frac{dy}{dx} + y = 1$

17 $\frac{dy}{dx} + \frac{1}{x}y = x$

18 $\frac{dy}{dx} + y = x^{21}$

19 $x\frac{dy}{dx} + x^2y = x^3$

20 $x\frac{dy}{dx} + xy = xsinx$

**यथार्थ विकलक समीकरण : ( Exact differential equation)** (एक्सएक्ट डिफरेंशियल इक्वेशन)

दिलेले विकलक समीकरण Mdx + Ndy = 0 ,

येथे M आणि N हे चल x , y चे फल (functions) किंवा स्थिरांक आहेत

याला यथार्थ विकलक समीकरण म्हणतात ,जेव्हा $\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$

यथार्थ विकलक समीकरणाची उकल (Solution ) खालीलप्रमाणे

$$\int_{y\ constant} Mdx + \int_{Terms\ of\ y\ only\ or\ constant} N\,dy = C$$

## सोडविलेली उदाहरणे

1. विकलक समीकरणयथार्थआहे हे दाखवा.
   $(3x^2 - y)\,dx - x\,dy = 0$

उत्तर:
दिलेले,
$(3x^2 - y)\,dx - x\,dy = 0$
$M = 3x^2 - y$ आणि $N = -x$
M ला y च्या संदर्भात आंशिक विकलन (Differentiate) करू.

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(3x^2 - y)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(3x^2) - \frac{\partial}{\partial y}(y)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = 0 - 1$$

$\therefore \frac{\partial M}{\partial y} = -1$ -----------------1

N ला x च्या संदर्भात आंशिक विकलन (Differentiate) करू.
$N = -x$

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial x}(-x)$$

$\therefore \frac{\partial N}{\partial x} = -1$------------------2

समीकरण 1 आणि 2 वरुन

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$$

म्हणून दिलेले विकलक समीकरण यथार्थ आहे .

2. दिलेले विकलक समीकरण यथार्थ आहे हे दाखवा.
$(5x^4+3x^2y^2- 2xy^3) \, dx + (2x^3y - 3x^2y^2- 5y^4) \, dy = 0$
उत्तर :
दिलेले
$(5x^4+3x^2y^2- 2xy^3) \, dx + (2x^3y - 3x^2y^2- 5y^4) \, dy = 0$
$M = 5x^4+3x^2y^2- 2xy^3$ आणि $N = 2x^3y - 3x^2y^2- 5y^4$
M ला y च्या संदर्भात आंशिक विकलन करू.

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(5x^4 + 3x^2y^2 - 2\text{xy}3)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(5x^4) + \frac{\partial}{\partial y}(3x^2y^2) - \frac{\partial}{\partial y}(2xy^3)$$
$$\frac{\partial M}{\partial y} = 0 + 6x^2y - 6xy^2$$
$$\therefore \frac{\partial M}{\partial y} = 6x^2y - 6xy^2 \quad \text{-------------}(1)$$
$N = 2x^3y - 3x^2y^2- 5y^4$
N ला x च्या संदर्भात आंशिक विकलन करू.

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial y}(2x^3\text{y} - 3x^2y^2 - 5\text{y}^4)$$

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial x}(2x^3\text{y}) - \frac{\partial}{\partial x}(3x^2y^2) - \frac{\partial}{\partial x}(5y^4)$$
$$\frac{\partial N}{\partial x} = 6x^2y - 6xy^2 + 0$$
$$\therefore \frac{\partial N}{\partial x} = 6x^2y - 6xy^2 \quad \text{----------------}(2)$$
समीकरण 1 आणि 2 वरुन
$$\therefore \frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$$
म्हणून दिलेले विकलक समीकरणयथार्थआहे.

3. सोडावा: $(x^2 + 6xy - y^2) \, dx + (3x^2 - 2xy + y^2) \, dy = 0$

उत्तर :
दिलेले,
$(x^2 + 6xy - y^2) dx + (3x^2 - 2xy + y^2) dy = 0$
$M = x^2 + 6xy - y^2$ आणि $N = 3x^2 - 2xy + y^2$
M ला y च्या संदर्भात आंशिक विकलन करू.

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(x^2 + 6\text{xy} - \text{y}^2)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(x^2) + \frac{\partial}{\partial y}(6\text{xy}) - \frac{\partial}{\partial y}(\text{y}^3)$$
$$\frac{\partial M}{\partial y} = 0 + 6x - 2y$$

$\frac{\partial M}{\partial y} = 6x - 2y$------------------------------(1)

N ला x च्या संदर्भात आंशिक विकलन करू.

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial y}(3x^2 - 2\text{xy} + \text{y}^2)$$

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial x}(3x^2) - 2y\frac{\partial}{\partial x}(\text{x}) + \frac{\partial}{\partial x}(\text{y}^2)$$

$$\frac{\partial N}{\partial x} = 6x - 2y + 0$$

$\frac{\partial N}{\partial x} = 6x - 2y$ ------------------------(2)

समीकरण 1 आणि 2 वरुन

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$$

म्हणूनदिलेले विकलकसमीकरणयथार्थआहे .

यथार्थविकलक समीकरणाचे , उकल (Solution ) खालीलप्रमाणे

$$\int Mdx + \int Ndy = c$$

येथे M चे संकलन करताना y हा स्थिरांक आहे आणि N चे संकलन करताना N मधील y आणि स्थिरांकचे संकलन करू

$$\int (x^2 + 6\text{xy} - \text{y}^2)dx + \int \text{y}^2 dy = c$$

$$\int x^2\text{dx} + \int 6\text{xydx} - \int \text{y}^2\,\text{dx} + \int \text{y}^2 dy = c$$

$$\int x^2\text{dx} + 6\text{y}\int \text{xdx} - \text{y}^2\int 1\,\text{dx} + \int \text{y}^2 dy = c$$

$\frac{x^3}{3} + 6\text{y}\frac{x^2}{2} - \text{y}^2\,\text{x} + \frac{y^3}{3} = \text{c}$

$\frac{x^3}{3} + 3\text{x}^2\text{y} - \text{x}\,\text{y}^2 + \frac{y^3}{3} = \text{c}$

4. सोडावा : (2xy+ y –tany )dx + ($x^2$ - x$\tan^2$y + $\sec^2$y )dy = 0

उत्तर :

दिलेले,

(2xy+ y –tany )dx + ($x^2$ - x$\tan^2$y $\sec^2$y )dy = 0

M = 2xy+ y – tany आणि N = $x^2$ - x $\tan^2$y +$\sec^2$y

M ला y च्या संदर्भात आंशिक विकलन करू

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(2\text{xy} + \text{y} - \text{tany})$$

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(2\text{xy}) + \frac{\partial}{\partial y}(\text{y}) - \frac{\partial}{\partial y}(tany)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = 2x + 1 - sec^2 y$$

$$\frac{\partial M}{\partial y} = 2x - tan^2 y \quad \text{----------------(1)}$$

N ला x च्या संदर्भात आंशिक विकलन करू

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial y}(\mathrm{x}^2 - \mathrm{x}\tan^2\mathrm{y} + \sec^2\mathrm{y})$$

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial x}(\mathrm{x}^2) - \frac{\partial}{\partial x}(\mathrm{x}\tan^2\mathrm{y}) + \frac{\partial}{\partial x}(\sec^2\mathrm{y})$$

$$\frac{\partial N}{\partial x} = 2x - \tan^2\mathrm{y} + 0$$

$$\frac{\partial N}{\partial x} = 2x - \tan^2\mathrm{y} \quad \text{------------------(2)}$$

समीकरण 1 आणि 2 वरुन\

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$$

म्हणूनदिलेले विकलक समीकरण यथार्थ आहे.
यथार्थ विकलक समीकरणाचे , उकल (Solution ) खालीलप्रमाणे

$$\int Mdx + \int Ndy = c$$

येथे M चे संकलन करताना y हा स्थिरांक आहे आणि N चे संकलन करताना N मधील y आणि स्थिरांकचे संकलन करू

$$\int (2\mathrm{xy} + \mathrm{y} - \tan\mathrm{y})dx + \int \sec^2\mathrm{y}\, dy = c$$

$$2y\int \mathrm{xdx} + \mathrm{y}\int 1\mathrm{dx} - \tan\mathrm{y}\int 1\,\mathrm{dx} + \int \sec^2\mathrm{y}dy = c$$

$$2y\,\frac{x^2}{2} + \mathrm{xy} - \mathrm{x}\tan\mathrm{y} + \tan\mathrm{y} = \mathrm{c}$$

$$\mathrm{x^2y} + \mathrm{xy} - \mathrm{x}\tan\mathrm{y} + \tan\mathrm{y} = \mathrm{c}$$

5.सोडावा : $(y^3 \sec^2 x)\, dx + (3y^2 \tan x - \sec^2 y)\, dy = 0$

उत्तर :
दिलेले,
$(y^3 \sec^2 x)\, dx + (3y^2 \tan x - \sec^2 y)\, dy = 0$
$M = y^3 \sec^2 x$ आणि $N = 3y^2 \tan x - \sec^2 y$

M ला y च्या संदर्भात आंशिक विकलन करू

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(y^3\sec^2\mathrm{x})$$

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(y^3\sec^2\mathrm{x})$$

$$\frac{\partial M}{\partial y} = 3y^2\sec^2\mathrm{x} \quad \text{-------------1}$$

N ला x च्या संदर्भात आंशिक विकलन करू

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial y}( 3y^2 tanx - sec^2 y)$$

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial x}(3y^2 tanx) - \frac{\partial}{\partial x}(sec^2 y) +$$

$$\frac{\partial N}{\partial x} = 3y^2 sec^2 x - o$$

$$\frac{\partial N}{\partial x} = 3y^2 sec^2 x \text{ --------------2}$$

समीकरण 1 आणि 2 वरुन\

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$$

म्हणून दिलेले विकलक समीकरण यथार्थ आहे.
दिलेले यथार्थ विकलक समीकरणाचे , उकल (Solution )खालीलप्रमाणे

$$\int Mdx + \int Ndy = c$$

येथे M चे संकलन करताना y हा स्थिरांक आहे आणि Nचे संकलन करताना N मधील y आणि स्थिरांकचे संकलन करू

$$\int (y^3 \sec^2 x)dx + \int -\sec^2 y\, dy = c$$

$$y^3 \int \sec^2 x dx - \int \sec^2 y dy = c$$

$y^3 tanx - tany = c$

6. सोडावा : ( 2x + 3cosy )dx + ( 2y - 3xsiny ) dy = 0

उत्तर :
दिलेले,
(2x + 3cosy) dx + (2y - 3xsiny) dy = 0
M = 2x + 3cosy आणि N = 2y - 3xsiny

M ला y च्या संदर्भात आंशिक विकलन करू

$$\frac{\partial M}{\partial Y} = \frac{\partial}{\partial y}(2x + 3cosy)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial}{\partial y}(2x) + \frac{\partial}{\partial y}( 3cosy)$$

$$\frac{\partial M}{\partial y} = 0 - 3siny$$

$$\frac{\partial M}{\partial y} = -3siny \text{ --------- -----------(1)}$$

N ला x च्या संदर्भात आंशिक विकलन करू

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial y}(2y - 3xsiny )$$

$$\frac{\partial N}{\partial x} = \frac{\partial}{\partial x}(2y) - \frac{\partial}{\partial x}(3x\sin y)$$

$\frac{\partial N}{\partial x} = -3\, siny$ $\quad \frac{\partial N}{\partial x} = -3siny$ --------------------(2)

समीकरण 1 आणि 2 वरुन

$$\frac{\partial M}{\partial y} = \frac{\partial N}{\partial x}$$

म्हणून दिलेले विकलक समीकरण यथार्थ आहे.

यथार्थ विकलक समीकरणाचे , उकल (Solution )खालीलप्रमाणे

$$\int Mdx + \int Ndy = c$$

येथे M चेसंकलन करताना y हा स्थिरांक आहे आणि N चे संकलन करताना N मधील y आणि स्थिरांकचे संकलन करू

$$\int (2x + 3\cos y)dx + \int 2y\ dy = c$$

$$\int (2xdx + \int 3\cos y\ dx + \int 2y\ dy = c$$

$$\int (2xdx + 3\cos y \int 1\ dx + \int 2y\ dy = c$$

$$2\frac{x^2}{2} + 3\cos y\ .x + 2\frac{y^2}{2} = c$$

$$x^2 + 3x\ \cos y + y^2 = c$$

## सराव प्रश्नसंच

Q1 दिलेले विकलक समीकरण यथार्थ आहे हे दाखवा :

1. $(e^x+2xy^2+y^3)\ dx + (a^y+2x^2y+3xy^2)\ dy = 0$
2. $(3x^2+6xy^2)dx + (6x^2y+4y^2)\ dy = 0$

Q2 .खालील विकलक समीकरणे सोडवा :

1. $(2x^2+6xy-y^2)\ dx+(3x^2-2xy+y^2)dy = 0$
2. $(\sin x\ .\ \cos y + e^{2x})\ dx +(\cos x\ \sin y+ \tan y)\ dy = 0$
3. $(1+e^{\frac{x}{y}})\ dx + e^{\frac{x}{y}}\ (1- \frac{x}{y})dy = 0$
4. $(4x^3y^2 + y\cos(x.y))\ dx + (2x^4y + x\cos(xy))\ dy = 0$

## १.४ ॲप्लिकेशन्स ऑफ़ डिफरेंशियल इक्वेशन एंड रिलेटेड इंजीनियरिंग प्रोब्लेम्स

## (Applications of Diff. Eqn. and related Engineering Problems)

(This topic is applicable to tutorial only)

### सोडविलेले उदाहरणे

**1)** कणाची गती $\frac{dx}{dt} = 3t^2 - 6t + 8$ ह्या समीकरणाद्वारे दिली जाते. तर 2 सेकंदात व्यापलेले अंतर शोधा. दिलेले $x = 0$ ; $t = 0$

उत्तर: दिलेले: $\frac{dx}{dt} = 3t^2 - 6t + 8$

$\therefore \quad dx = (3t^2 - 6t + 8)dt$

संकलन केल्यावर (Integrating),

$\Rightarrow \quad \int dx = \int (3t^2 - 6t + 8)dt$

$\Rightarrow \quad x = 3\left(\frac{t^3}{3}\right) - 6\left(\frac{t^2}{2}\right) + 8t + c$

$\Rightarrow \quad x = t^3 - 3t^2 + 8t + c$

दिलेले $x = 0$ at $t = 0$

$\therefore \quad c = 0$

$\therefore \quad x = t^3 - 3t^2 + 8t$

$\therefore$ 2 सेकंदात व्यापलेले अंतर,

$x = (2)^3 - 3(2)^2 + 8(2)$

$\Rightarrow \quad x = 12$ एकक

**2)** गतिविषयक नियमाला अनुसरून फिरणारी चल वस्तू $\frac{d^2x}{dt^2} = 3t^2$ या समीकरणाने दिली आहे. तर $t = 1$ आणि $v = 2$ असतांना वेग शोधा.

उत्तर: दिलेले: $\frac{d^2x}{dt^2} = 3t^2$

$\Rightarrow \quad \frac{dv}{dt} = 3t^2$

$\Rightarrow \quad dv = 3t^2\, dt$

संकलन केल्यावर (Integrating),

$\therefore \int dv = \int 3t^2 dt$

$\Rightarrow \quad v = t^3 + c$

इथे $\quad t = 1, v = 2$

$\Rightarrow \quad 2 = 1 + c$

$\therefore \quad c = 1$

$\therefore \quad v = t^3 + 1$

आता $\quad t = 1$ साठी $v = 1^3 + 1$

$\Rightarrow \quad v = 2$ एकक /सेकंद

**3)** विमानाच्या स्थिरतेच्या सिद्धांताशी संबंधित एक समीकरण $\frac{\mathbf{dv}}{\mathbf{dt}} = \mathbf{g\,.\cos\alpha - kv}$ असे आहे, इथे **v** म्हणजे वेग आहे तसेच **g** आणि **k** स्थिर आहेत. जेव्हा $\mathbf{v = 0}$ ; $\mathbf{t = 0}$ असेल तर त्या वेळेचा वेग काढा.

उत्तर: दिलेले: $\frac{dv}{dt} = g\,.\cos\alpha \; - \; kv$

$\Rightarrow \quad \frac{dv}{dt} + \; kv = g\,.\cos\alpha$ रेखीय विकलक समीकरण

इथे $\quad P \; = \; k$ आणि $Q \; = g\,.\cos\alpha$

$\therefore \quad I.F. = e^{\int p\, dt} = e^{\int k\, dt} = e^{kt}$

$\therefore$ रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे

$v\,(I.F.) = \int Q(I.F.)dt + c$

$\Rightarrow \quad ve^{kt} = \int (g.\cos\alpha)e^{kt}dt + c$

$\Rightarrow \quad ve^{kt} = (g.\cos\alpha) \int e^{kt}dt + c$

$\Rightarrow \quad v = \frac{g}{k}\cos\alpha + ce^{-kt}$

दिलेले $\quad t = 0\,, v = 0$

$\therefore \quad 0 = \frac{g}{k}\cos\alpha + c\, e^{0}$

$\Rightarrow \quad c = -\frac{g}{k}\cos\alpha$

$\therefore \quad v = \frac{g}{k}\cos\alpha - \frac{g}{k}\cos\alpha\ e^{-kt}$

$\Rightarrow \quad v = \frac{g}{k}\cos\alpha\ (1 - e^{-kt})$

**4)** 6 मीटर /सेकंद वेगाने पासून सुरू होणाऱ्या कणाच्या त्वरण (acceleration) चे समीकरण $(\mathbf{1 - t^2})\mathbf{m/sec^2}$ आहे. ते प्रथम कधी विश्रांती घेणार? त्याने किती दूर प्रवास केला ?

उत्तर: दिलेले: त्वरण (acceleration) चे समीकरण $(1 - t^2)m/sec^2$

$\therefore \quad \frac{dv}{dt} = 1 - t^2$

$\Rightarrow \quad dv = (1 - t^2)dt$

संकलन केल्यावर (Integrating),

$\therefore \quad \int dv = \int (1 - t^2)dt$

$\Rightarrow \quad v = t - \frac{t^3}{3} + c$

दिलेले: $v = 6$ and $t = 0 \therefore c = 6$

$\therefore \quad v = t - \frac{t^3}{3} + 6$

ज्या वेळेस वेग शून्य होणार त्या वेळेस कण विश्रांती घेणार.

$\therefore \quad t - \frac{t^3}{3} + 6 = 0$

$\Rightarrow \quad t^3 - 3t - 18 = 0$

$\Rightarrow \quad (t - 3)(t^2 + 3t + 6) = 0$

$\Rightarrow \quad t = 3$ सेकंद

आता $\quad v = t - \frac{t^3}{3} + 6$

$\Rightarrow \quad \frac{dx}{dt} = t - \frac{t^3}{3} + 6 \qquad \because \quad v = \frac{dx}{dt}$

$\Rightarrow \quad dx = \left(t - \frac{t^3}{3} + 6\right) dt$

संकलन केल्यावर (Integrating),

$\therefore \quad \int dx = \int \left(t - \frac{t^3}{3} + 6\right) dt$

$\Rightarrow \quad x = \frac{t^2}{2} - \frac{t^4}{12} + 6t + c_1$

प्रारंभी $x = 0, t = 0$

$\therefore \quad c_1 = 0$

$\Rightarrow \quad x = \frac{t^2}{2} - \frac{t^4}{12} + 6t$

आता $t = 3$ सेकंद

$x = \frac{3^2}{2} - \frac{3^4}{12} + 6(3)$

$\Rightarrow \quad x = 15.75$ मीटर

**5)** रोध-धारिता परिपथ मांडणी (RC series circuit) चे विकलक समीकरण $\frac{\mathbf{dq}}{\mathbf{dt}} + \frac{\mathbf{1}}{\mathbf{RC}}\mathbf{q} = \frac{\mathbf{E}}{\mathbf{R}}$ असे आहे. ज्या वेळेस $\mathbf{q = 0}$ ; $\mathbf{t = 0}$ आणि $\mathbf{E, R, C}$ स्थिर असतील तेव्हा q चे मूल्य शोधा.

उत्तर: दिलेले: $\frac{dq}{dt} + \frac{1}{RC} q = \frac{E}{R}$

इथे $P = \frac{1}{RC}$ and $Q = \frac{E}{R}$

$\therefore \quad I.F. = e^{\int p dx}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\int \frac{1}{RC} dt}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\frac{1}{RC}\int dt}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\frac{1}{RC} \cdot t}$

$\Rightarrow \quad I.F. = e^{\frac{t}{RC}}$

$\therefore$ रेखीय विकलक समीकरणाचे उकल (solution) खालीलप्रमाणे

$$q \cdot (I.F.) = \int Q \cdot (I.F.) dt + c_1$$

$\Rightarrow \quad q \cdot e^{\frac{t}{RC}} = \int \frac{E}{R} \cdot e^{\frac{t}{RC}} dt + c_1$

$\Rightarrow \quad q \cdot e^{\frac{t}{RC}} = \frac{E}{R} \cdot e^{\frac{t}{RC}} \cdot \frac{1}{\frac{1}{RC}} + c_1$

$\Rightarrow \quad q \cdot e^{\frac{t}{RC}} = EC \cdot e^{\frac{t}{RC}} + c_1$

जेव्हा $q = 0$ तेव्हा $t = 0$

$\therefore \quad 0 = EC + c_1$

$\Rightarrow \quad c_1 = -EC$

$\therefore \quad q \cdot e^{\frac{t}{RC}} = EC \cdot e^{\frac{t}{RC}} - EC$

$\Rightarrow \quad q = EC - \frac{EC}{e^{\frac{t}{RC}}}$

$\Rightarrow \quad q = EC - EC\, e^{\frac{-t}{RC}}$

$\Rightarrow \quad q = EC \left(1 - e^{\frac{-t}{RC}}\right)$

**6)** विद्युतप्रवाह चे समीकरण $\mathbf{L \frac{di}{dt} = 30 \sin(10\pi t)}$ असे आहे , इथे **L** प्रेरितता (inductance) आणि **t** वेळ आहे. तर विद्युतप्रवाह (i) ची किंमत काढा . दिलेले $\mathbf{L = 2}$ आणि $\mathbf{i = 0}$ जेव्हा $\mathbf{t = 0}$

उत्तर: दिलेले: $L\frac{di}{dt} = 30\sin(10\pi t)$

$\Rightarrow \quad L\, di = 30 \sin(10\pi t)\, dt$

संकलन केल्यावर (Integrating),

$\therefore \int L di = \int 30\sin(10\pi t) dt$

$\Rightarrow \quad L\, i = 30 \left(\frac{-\cos(10\pi t)}{10\pi}\right) + c$

$\Rightarrow \quad L\, i = \frac{-3\cos(10\pi t)}{\pi} + c$

$i = 0$ जेव्हा $t = 0$

$\therefore \quad L\,(0) = \frac{-3\cos(0)}{\pi} + c$

$\Rightarrow \quad 0 = \frac{-3}{\pi} + c$

$\Rightarrow \quad c = \frac{3}{\pi}$

$\therefore \quad L\,i = \frac{-3\cos(10\pi t)}{\pi} + \frac{3}{\pi}$

दिलेले $L = 2$

$\therefore \quad 2i = \frac{-3\cos(10\pi t)}{\pi} + \frac{3}{\pi}$

$\Rightarrow \quad i = \frac{3}{2\pi}\{1 - \cos(10\pi t)\}$

**7)** तुळई (Beam) चे नमन आघुर्ण (Bending Moment) दोन्ही टोकांवर समर्थित आणि एका टोकापासून x अंतरावर एकसारखेपणाने भरीव आहे. त्याचे समीकरण जर $\frac{\mathbf{dM}}{\mathbf{dx}} = \frac{\mathbf{WL}}{\mathbf{2}} - \mathbf{Wx}$ असे असेल जिथे W प्रति एकक लांबी तुळई चे भार आहे तर बीमचा नमन आघुर्ण M शोधा.

उत्तर: दिलेले: $\frac{dM}{dx} = \frac{WL}{2} - Wx$

$\Rightarrow \quad dM = \left(\frac{WL}{2} - Wx\right)dx$

संकलन केल्यावर (Integrating),

$\therefore \quad \int dM = \int \left(\frac{WL}{2} - Wx\right) dx$

$\Rightarrow \quad M = \frac{WL}{2}\int dx - W\int x^2 dx$

$\Rightarrow \quad M = \frac{WL}{2}\cdot x - W\cdot\frac{x^2}{2} + c$

जेव्हा $M = 0$ ; $x = 0$

$\therefore \quad c = 0$

$\therefore \quad M = \frac{WL}{2}\cdot x - \frac{Wx^2}{2}$

**8)** v सेमी / सेकंदासह क्षितिज समांतर(horizontally) प्रवास करणाऱ्या वायुवाहन (air-craft) ने विकसित केलेली अश्वशक्ति (horse–power) शोधा जर $\frac{\mathbf{dH}}{\mathbf{dv}} = \frac{\mathbf{k}}{\mathbf{550}}\left\{\mathbf{T} - \frac{\mathbf{2wv}}{\mathbf{g}}\right\}$ , इथे T, k , w, g स्थिर आहेत.

उत्तर: दिलेले: $\frac{dH}{dv} = \frac{k}{550}\left\{T - \frac{2wv}{g}\right\}$

$\Rightarrow \quad dH=\frac{k}{550}\left\{T - \frac{2wv}{g}\right\}dv$

संकलन केल्यावर (Integrating),

$\therefore \quad \int dH = \frac{k}{550}\int\left(T - \frac{2wv}{g}\right)dv$

$\Rightarrow \quad H = \frac{k}{550}\left\{T\int dv - \frac{2w}{g}\int vdv\right\}$

$\Rightarrow \quad H = \frac{k}{550}\left\{Tv - \frac{2w}{g}\cdot\frac{v^2}{2}\right\} + c$

$\Rightarrow \quad H = \frac{k}{550}\left\{Tv - \frac{w\,v^2}{g}\right\} + c$

आता $H = 0$ at $V = 0$

$\therefore \quad c = 0$

$\therefore \quad H = \frac{k}{550}\left\{Tv - \frac{w\,v^2}{g}\right\}$

# Unit-IV

## (न्यूमेरिकल मेथड्स)

## (Numerical Methods)

### (सलूशन ऑफ़ अलजेब्रिक इक्वेशन)

### (Solution of Algebraic equations)

### (सलूशन ऑफ़ सायमलटेनिअस इक्वेशन)

### (Solution of simultaneous equations)

# (Unit IV)

# संख्यात्मक पद्धती (Numerical Methods) (न्यूमेरिकल मेथड्स)

CO4 - प्रोग्राम विशिष्ट समस्या सोडवण्यासाठी संख्यात्मक पद्धती वापरा.

* सैद्धांतिक शिक्षण परिणाम (Theory learning outcome)

A) योग्य पद्धती द्वारे बीजगणितीय समीकरणांची मुळे शोधा

B) पुनरावृत्तीच्या पद्धतींद्वारे अज्ञात समीकरण तीन प्रणाली मध्ये सोडवा.

C) बख्शाली पुनरावृत्ती पद्धत वापरून अंदाजे वर्गमुळ समस्या सोडवा (IKS)

* ओळख : बैजिक समीकरणांचे निराकरण करण्यासाठी संख्यात्मक पद्धती *(Numerical Methods)* उपयुक्त आहेत. पद्धती व पुनरावृत्ती (Iterative Methods ) सर्व प्रणाली मध्ये वापरल्या जातात.

F(x) = 0 या स्वरूपाच्या अभिव्यक्तीला बीजगणित समीकरण म्हणतात. अधिक अचूक निराकरण करण्यासाठी या अंदाजे पद्धती (Approximate methods) वापरल्या जातात.

* या अध्यायात आपण अंदाजे निराकरण मिळवण्यासाठी खालील पद्धतीबद्दल चर्चा करणार आहोत

1) बैजिक समीकरणाचे (Algebraic Equation) निराकरण

2) एकसामायिक समीकरणाचे (Simultaneous Equations) निराकरण

## ४.१ (सलूशन ऑफ़ अलजेब्रिक इक्वेशन) (Solution of Algebraic Equations):

बैजिक समीकरणाचे (algebraic equations) निराकरण करण्यासंदर्भात खालील पद्धतीं उपयुक्त आहेत.

- ❖ दुभाजन पद्धत( Bisection Method)
- ❖ रेग्युला फाल्सी पद्धत (Regula – Falsi method )
- ❖ न्यूटन रॅफसन पद्धत (Newton – Raphson method)

## A) दुभाजन पद्धत (Bisection Method): (बायसेक्शन मेथड)

दुभाजन पद्धत (Bisection Method) ही पुनरावृत्ती करण्याची पद्धत (iterative method) आहे जी बैजिक समीकरणाचे अंदाजे उकल शोधण्यासाठी वापरली जाते. जर $f(x)$ हे $[a, b]$ या मध्यांतरात (interval) अविरत (continuous) असेल आणि जर $f(a)$ आणि $f(b)$ यांची चिन्हे विरुद्ध असतील तर $f(x) = 0$ या समीकरणाचे कमीतकमी एक वास्तविक उकल (real root) हे $a$ आणि $b$ च्या दरम्यान असेल. या प्रमेयला‘ चाचणी व त्रुटी ”पद्धत (‘ Trial आणि Error ‘method) असेही म्हणतात.

➢ निराकरण शोधण्याची पद्धत (Method to find Solution):

जर $f(x)$ हे $[a, b]$ या मध्यांतरात (interval) संतत फल (continuous function) असेल आणि $f(a)$ आणि $f(b)$ यांची चिन्हे विरुद्ध असतील i.e. $f(a).f(b)) < 0$ तर प्रारंभिक अंदाज पुढील $x_0 = \frac{a+b}{2}$ या सूत्रानुसार घ्यावा.

पुढील मुद्द्यांची नोंद घ्या :

a) जर $f(x_0) = 0$ तर आपल्याला $x_0$ हे उकल (root) मिळेल.

b) जर $f(a)) \cdot f(x_0) < 0$ तर उकल (root) हे a आणि $x_0$ च्या दरम्यान असेल.

$\therefore \quad x_1 = \frac{a + x_0}{2}$ आणि नंतर मध्यांतर पुन्हा थांबवून प्रक्रियेची पुनरावृत्ती करा.

c) जर $f(b) \cdot f(x_0) < 0$ तर उकल (root) हे b आणि $x_0$ च्या दरम्यान असेल.

$\therefore \quad x_1 = \frac{b + x_0}{2}$ आणि नंतर मध्यांतर पुन्हा थांबवून प्रक्रियेची पुनरावृत्ती करा.उकल (root) इच्छित अचूकतेपर्यंत आढळत नाही तोपर्यंत प्रक्रिया सुरू ठेवा.

---

## सोडवलेली उदाहरणे

**1)** दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $\mathbf{x^2 - x - 4 = 0}$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा).

उत्तर: इथे $f(x) = x^2 - x - 4$

$\therefore \quad f(0) = 0 - 0 - 4 = -4 < 0$

$f(1) = 1 - 1 - 4 = -4 < 0$

$f(2) = 4 - 2 - 4 = -2 < 0$

$f(3) = 9 - 3 - 4 = 2 > 0$

$\because \quad f(2) < 0$ आणि $f(3) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल(root) 3 आणि 2 दरम्यान दरम्यान असेल.

$\therefore$ पहिले निकटन ( approximation),

$x_0 = \frac{2 + 3}{2}$

$\Rightarrow \quad \mathbf{x_0 = 2.5}$

तसेच, $f(2.5) = (2.5)^2 - (2.5) - 4 = -0.25 < 0$

$\because \quad f(2.5) < 0$ आणि $f(3) > 0$ $\therefore$

चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 2.5 आणि 3 दरम्यान असेल.

∴ दूसरे निकटन ( approximation) ,

$x_1 = \frac{2.5 + 3}{2}$

⟹ $\mathbf{x_1 = 2.75}$

तसेच, $f(2.75) = (2.75)^2 - (2.75) - 4 = 0.81 > 0$

∵ $f(2.5) < 0$ आणि $f(2.75) > 0$

∴ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 2.5 आणि 2.75 दरम्यान असेल.

∴ तिसरे निकटन ( approximation),

$x_2 = \frac{2.5 + 2.75}{2}$

⟹ $\mathbf{x_2 = 2.63}$

∴ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल (approximate root) आहे $\mathbf{x = 2.63}$

**2)** दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करुन $\mathbf{x^3 - 2x - 5 = 0}$ या समीकरणाचे उकल (root) मध्यांतर $(\mathbf{2, 3})$ शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा).

उत्तर: इथे $f(x) = x^3 - 2x - 5$

∴ $f(2) = 8 - 4 - 5 = -1 < 0$

$f(3) = 27 - 6 - 5 = 16 > 0$

∵ $f(2) < 0$ आणि $f(3) > 0$

∴ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 2 आणि 3 दरम्यान असेल .

∴ पहिले निकटन ( approximation),

$x_0 = \frac{2 + 3}{2}$

⟹ $\mathbf{x_0 = 2.5}$

तसेच, $f(2.5) = (2.5)^3 - 2(2.5) - 5 = 5.625 > 0$

$\because$ $f(2) < 0$ आणि $f(2.5) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 2 आणि 2.5 दरम्यान असेल.

$\therefore$ दूसरे निकटन ( approximation),

$x_1 = \frac{2 + 2.5}{2}$

$\Rightarrow$ $\mathbf{x_1 = 2.25}$

तसेच, $f(2.25) = (2.25)^3 - 2(2.25) - 5 = 1.891 > 0$

$\because$ $f(2) < 0$ आणि $f(2.25) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 2 आणि 2.25 दरम्यान असेल.

$\therefore$ तिसरे निकटन ( approximation),

$x_2 = \frac{2 + 2.25}{2}$

$\Rightarrow$ $\mathbf{x_2 = 2.125}$

$\therefore$ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल (approximate root) आहे $\mathbf{x = 2.125}$

**3)** **दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $\sqrt{10}$ चे मूल्य तीन पुनरावृत्ती करून माहित करा.**

**उत्तर:** इथे $x = \sqrt{10}$ $\therefore$ $x^2 = 10$

$\Rightarrow$ $x^2 - 10 = 0$

$\because$ $f(x) = x^2 - 10$

$\therefore$ $f(0) = 0 - 10 = -10 < 0$

$f(1) = 1 - 10 = -9 < 0$

$f(2) = 4 - 10 = -6 < 0$

$f(3) = 9 - 10 = -1 < 0$

$f(4) = 16 - 10 = 6 > 0$

$\because$ $f(3) < 0$ आणि $f(4) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 3 आणि 4 दरम्यान असेल.

$\therefore$ पहिले निकटन ( approximation),

$$x_0 = \frac{3+4}{2}$$

$\Rightarrow$ $\mathbf{x_0 = 3.5}$

तसेच, $f(3.5) = (3.5)^2 - 10 = 2.25 > 0$

$\because$ $f(3) < 0$ आणि $f(3.5) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 3 आणि 3.5 दरम्यान असेल.

$\therefore$ दूसरे निकटन (approximation),

$$x_1 = \frac{3+3.5}{2}$$

$\Rightarrow$ $\mathbf{x_1 = 3.25}$

तसेच, $f(3.25) = (3.25)^2 - 10 = 0.5625 > 0$

$\because$ $f(3) < 0$ आणि $f(3.25) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी (trial and error method) पद्धतीनुसार उकल 3 आणि 3.25 दरम्यान असेल.

$\therefore$ तिसरे निकटन ( approximation),

$$x_1 = \frac{3+3.25}{2}$$

$\Rightarrow$ $\mathbf{x_1 = 3.125}$

$\therefore$ $\sqrt{10}$ चे अंदाजे उकल (approximate root) आहे $\mathbf{x = 3.125}$

## सराव प्रश्नसंच

1) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $x^3 - 2x - 5 = 0$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा)

2) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $x^3 - 4x - 9 = 0$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा)

3) दुभाजनपद्धतीचा (Bisection method) वापर करून $x^3 - 5x + 1 = 0$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा)

4) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $x^3 - 9x - 1 = 0$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा)

5) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $x^3 - 6x + 3 = 0$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा)

6) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $x^3 + x - 3 = 0$ या समीकरणाचे उकल (root) शोधा.(तीन वेळा पुनरावृत्ती करा)

7) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $\sqrt{18}$ चे मूल्य तीन पुनरावृत्ती करून माहित करा.

8) दुभाजन पद्धतीचा (Bisection method) वापर करून $\sqrt{8}$ चे मूल्य तीन पुनरावृत्ती करून माहित करा.

## B) रेग्युला फाल्सी पद्धत (Regula Falsi Method )

रेग्युला फाल्सी-पध्दतीस (Regula Falsi Method ) खोटी स्थिती (false position) म्हणून ओळखले जाते कारण वक्रांची खोटी स्थिती (false position of curve) प्रारंभिक अंदाजे म्हणून घेतली जाते ही पुनरावृत्ती करण्याची पद्धत (iterative method) आहे. या पद्धतीच्या अचूकतेचे दर दुभाजनपद्धतीपेक्षा (Bisection method) बरेच वेगवान आहेत.

$f(x) = 0$ हे समीकरण विचारात घ्या जिथे $f(x)$ हे $[a, b]$ या मध्यांतरात (interval) संतत फल (continuous function) असेल आणि $f(a)$ आणि $f(b)$ यांची चिन्हे विरुद्ध असतील.

i.e. $f(a).f(b) < 0$ तर,

प्रारंभिक अंदाज पुढील सूत्रानुसार घ्यावा,

$$x_1 = a - \frac{b-a}{f(b)-f(a)} f(a)$$

$$\Rightarrow \quad x_1 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$f(x_1)$ चे मूल्य शोधा आणि जर $f(a).f(x_1) < 0$ तर $b = x_1$ घ्या.

$$x_2 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

आणि जर $f(b).f(x_1) < 0$ तर $a = x_1$ घ्या.

$$x_2 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$ वगैरे वगैरे.

उकल (root) इच्छित अचूकतेपर्यंत आढळत नाही तोपर्यंत प्रक्रिया सुरू ठेवा.

## सोडवलेली उदाहरणे

**1)** रेग्युला फाल्सी पध्दतीचा (Regula falsi method) वापर करून $\mathbf{x^3 - x - 1 = 0}$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा (तीन वेळा पुनरावृत्ती करा).

उत्तर: इथे $f(x) = x^3 - x - 1$

$\therefore$ $f(0) = 0 - 0 - 1 = -1 < 0$

$f(1) = 1^3 - 1 - 1 = -1 < 0$

$f(2) = 2^3 - 2 - 1 = 5 > 0$

$\because$ $f(1) < 0$ आणि $f(2) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी पद्धतीने (trial आणि error method) उकल (root) 1 आणि 2 च्या दरम्यान आहे.

$\therefore$ प्रारंभिक अंदाजे साठी (initial approximation ) विचारात घ्या

$a = 1$ आणि $b = 2$

$\therefore$ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method) ,

प्रथम निकटन (first approximation),

$$x_1 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$$\Rightarrow \quad x_1 = \frac{1(5) - 2(-1)}{5 - (-1)}$$

$$\Rightarrow \quad x_1 = 1.1666$$

आता $f(1.1666) = 1.1666^3 - 1.1666 - 1 = -0.5789 < 0$

$\therefore$ उकल (Root) हे 1.1666 आणि 2 च्या दरम्यान आहे

$\therefore$ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method) ,

द्वितीय निकटन ( second approximation),

$$x_2 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$\Rightarrow \quad x_2 = \frac{1.1666(5)\ - 2\,(-0.5789)}{5 - (-0.5789)}$

$\Rightarrow \quad x_2 = \frac{6.9908}{5.5789}$

$\Rightarrow \quad x_2 = 1.2530$

आता $f(1.2530) = 1.2530^3 - 1.2530 - 1 = -0.2857 < 0$

∴ उकल (Root) हे 1.2530 आणि 2 च्या दरम्यान आहे

∴ रेग्युला फाल्सी पद्धतीने तिसरे निकटन ( third approximation),

$$x_3 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$\Rightarrow \quad x_3 = \frac{1.2530(5) - 2(-0.2857)}{5 - (-0.2857)}$

$\Rightarrow \quad x_3 = \frac{6.8364}{5.2857}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.2934$

∴ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल $\mathbf{x = 1.2934}$ आहे.

**2)** रेग्युला फाल्सी पध्दतीचा (Regula falsi method) वापर करून $\mathbf{x^2 + x - 3 = 0}$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. (केवळ तीन पुनरावृत्ती (iterations) करा).

उत्तर: इथे $f(x) = x^2 + x - 3 = 0$

∴ $f(0) = 0^2 + 0 - 3 = -3 < 0$

$f(1) = 1^2 + 1 - 3 = -1 < 0$

$f(2) = 2^2 + 2 - 3 = 3 > 0$

∵ $f(1) < 0$ आणि $f(2) > 0$

∴ चाचणी आणि त्रुटी पद्धतीने (trial and error method) उकल (root) 1 आणि 2 च्या दरम्यान आहे.

∴ प्रारंभिक अंदाजे साठी (initial approximation )विचारात घ्या,

$a = 1$ आणि $b = 2$

∴ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method) ,

प्रथम निकटन (first approximation) आहे,

$$x_1 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$$\Rightarrow \quad x_1 = \frac{1(3) - 2(-1)}{3 - (-1)}$$

$$\Rightarrow \quad x_1 = \frac{5}{4}$$

$$\Rightarrow \quad x_1 = 1.25$$

$$f(1.25) = 1.25^2 + 1.25 - 3 = -0.188 < 0$$

∴ उकल (Root) हे 1.25 आणि 2 च्या दरम्यान आहे

∴ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method),

द्वितीय निकटन ( second approximation) आहे,

$$x_2 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$$\Rightarrow \quad x_2 = \frac{1.25(3) - 2(-0.188)}{3 - (-0.188)}$$

$$\Rightarrow \quad x_2 = \frac{4.1276}{3.188}$$

$$\Rightarrow \quad x_2 = 1.2942$$

आता $f(1.2942) = 1.2942^2 + 1.2942 - 3 = -0.032 < 0$

∴ उकल (Root) हे 1.2942 आणि 2 च्या दरम्यान आहे

∴ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method),

तिसरे निकटन ( third approximation) आहे,

$$x_3 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$\Rightarrow \quad x_3 = \dfrac{1.2942(3) - 2(-0.032)}{3 - (-0.032)}$

$\Rightarrow \quad x_3 = \dfrac{3.9466}{3.032}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.3016$

$\therefore$ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल $\mathbf{x = 1.3016}$ आहे.

**3)** चुकीची स्थिती पद्धत (false position method) वापरुन दोन पुनरावृत्ती करून, $(\mathbf{3,4})$ या मध्यांतरात $\sqrt{\mathbf{12}}$ चे अंदाजे मूल्य शोधा.

उत्तर: इथे $x = \sqrt{12}$

$\therefore \quad x^2 = 12$

$\Rightarrow \quad f(x) = x^2 - 12$

$\therefore \quad f(3) = 3^2 - 12 = -3 < 0$

$f(4) = 4^2 - 12 = 4 > 0$

$\because \quad f(3) < 0$ आणि $f(4) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी पद्धतीने (trial & error method) उकल (root) 3 आणि 4 च्या दरम्यान आहे.

$\therefore$ प्रारंभिक अंदाजे साठी (initial approximation ) $a = 3$ आणि $b = 4$ विचारात घ्या.

$\therefore$ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method) ,

प्रथम निकटन (first approximation),

$$x_1 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$\Rightarrow \quad x_1 = \dfrac{3(4) - 4(-3)}{4 - (-3)}$

$\Rightarrow \quad x_1 = \dfrac{24}{7}$

$\Rightarrow \quad x_1 = 3.4285$

आता $\quad f(3.4285) = (3.4285)^2 - 12 = -0.2453 < 0$

$\therefore$ उकल (Root) हे 3.4285 आणि 4 च्या दरम्यान आहे

$\therefore$ रेग्युला फाल्सी पद्धतीने (Regula falsi method) ,

द्वितीय निकटन ( second approximation),

$$x_2 = \frac{a\,f(b) - b\,f(a)}{f(b) - f(a)}$$

$$\Rightarrow \quad x_2 = \frac{3.4285(4) - 4(-0.2453)}{4 - (-0.2453)}$$

$$\Rightarrow \quad x_2 = \frac{14.6952}{4.2453}$$

$$\Rightarrow \quad x_2 = 3.4615$$

$\therefore$ $\sqrt{12}$ चे अंदाजे मूल्य $\mathbf{x = 3.4615}$ आहे.

# सराव प्रश्नसंच

1) रेग्युला फाल्सी पध्दतीचा (Regula falsi method) वापर करून $x^2 + x - 3 = 0$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. (केवळ तीन पुनरावृत्ती (iterations) करा)
2) रेग्युला फाल्सी पध्दतीचा (Regula falsi method) वापर करून $x^3 - 9x + 1 = 0$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. (केवळ तीन पुनरावृत्ती (iterations) करा)
3) दोन पुनरावृत्ती (two iterations) करून $x^3 - x - 4 = 0$ समीकरणाचे उकल शोधण्यासाठी चुकीची स्थिती पद्धत (false position method) वापरा .
4) तीन पुनरावृत्ती (three iterations) करून $x^3 - 4x + 1 = 0$ समीकरणाचे उकल शोधण्यासाठी चुकीची स्थिती पद्धत (false position method) वापरा .
5) तीन पुनरावृत्ती (three iterations) करून $x^3 - 2x - 5 = 0$ समीकरणाचे उकल शोधण्यासाठी चुकीची स्थिती पद्धत (false position method) वापरा .
6) तीन पुनरावृत्ती (three iterations) करून $x^3 + 2x^2 - 8 = 0$ समीकरणाचे उकल शोधण्यासाठी चुकीची स्थिती पद्धत (false position method) वापरा .
7) तीन पुनरावृत्ती (three iterations) करून $x^3 - 3x + 4 = 0$ समीकरणाचे उकल शोधण्यासाठी चुकीची स्थिती पद्धत (false position method) वापरा .
8) रेग्युला फाल्सी पध्दतीचा (Regula falsi method) वापर करून $x^2 - 2x - 1 = 0$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. (केवळ तीन पुनरावृत्ती (iterations) करा)
9) रेग्युला फाल्सी पध्दतीचा (Regula falsi method) वापर करून $x^2 - 2x - 5 = 0$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा.(केवळ तीन पुनरावृत्ती (iterations) करा).
10) रेग्युला फाल्सी पध्दत Regula- Falsi method) वापरुन, दोन पुनरावृत्ती करून $\sqrt{6}$ चे अंदाजे मूल्य शोधा.

## C) न्यूटन रॅफसन पद्धत (Newton Raphson method)

आयझॅक न्यूटन (Isaac Newton) आणि जोसेफ रॅफसन (Joseph Raphson) यांच्या नावावर असलेली न्यूटन -रॅफसन पद्धत (Newton-Raphson method) ही संख्यात्मकरीत्या समीकरणे सोडविण्याचे सामर्थ्यवान तंत्र आहे. ही पद्धत पुनरावृत्तीची(iterative method) आहे. एखाद्या समीकरणाचे अंदाजे उकल आपल्याला माहित असल्यास आपण त्याच्यापासून अधिक चांगले आणि जवळचे मूल्य शोधू शकतो.

जर $f(x)$ हे $a < x < b$ या मध्यांतरात अविरत (continuous) असेल, तसेच $f(a)$ आणि $f(b)$ ची चिन्हे विरुद्ध असतील तर $f(x) = 0$ या समीकरणाचे उकल (root) हे $(a, b)$ या मध्यांतर असेल. $f(a)$ शून्याच्या अधिक जवळ असल्यास $x_0$ म्हणून a चा विचार करा किंवा $f(b)$ शून्याच्या अधिक जवळ असल्यास $x_0$ म्हणून b चा विचार करा ,नंतर पुढील सूत्र वापरा,

$$x_{n+1} = x_n - \frac{f(x_n)}{f'(x_n)} \quad , \quad n = 0,1,2,3 \ldots \ldots \ldots$$

पुढील अंदाजे मूल्य शोधण्यासाठी $x_{1,}\ x_{2\,,} x_3 \ldots \ldots ..$

---

### सोडवलेली उदाहरणे

**1)** न्यूटन रॅफसन पद्धत (Newton-Raphson method) वापरुन $\mathbf{x^3 - 5x + 3 = 0}$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. [केवळ तीन पुनरावृत्ती(three iterations) करा]

उत्तर: समजा $f(x) = x^3 - 5x + 3 \cdots\cdots\cdots\cdots (i)$

$\therefore \quad f'(x) = 3x^2 - 5 \cdots\cdots\cdots\cdots (ii)$

$\therefore \quad f(0) = 0 - 0 + 3 = 3 > 0$

$f(1) = 1^3 - 5(1) + 3 = -1 < 0$

$\because$ $f(0) > 0$ आणि $f(1) < 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी पद्धतीने( trial and error method) उकल (root) 0 आणि 1 च्या दरम्यान आहे.

प्रारंभिक अंदाजे $x_0 = 1$ असू द्या ,

इथे $f(1) = -1$आणि $f'(x_0) = f'(1) = 3(1)^2 - 5 = -2$

$\therefore$ न्यूटन नेरॅफसन पद्धती-(Newton-Raphson method) प्रथम निकटन (first approximation) आहे,

$$x_1 = x_0 - \frac{f(x_0)}{f'(x_0)}$$

$$\Rightarrow \quad x_1 = 1 - \frac{f(1)}{f'(1)}$$

$$\Rightarrow \quad x_1 = 1 - \frac{-1}{-2}$$

$$\Rightarrow \quad x_1 = 1.5 - 0.5$$

$$\Rightarrow \quad \mathbf{x_1 = 0.5}$$

आता समीकरण (i) आणि (ii) वरुन,

$$f(x_1) = f(0.5) = (0.5)^3 - 5(0.5) + 3 = 0.625$$

$$f'(x_1) = f'(0.5) = 3(0.5)^2 - 5 = -4.25$$

$\therefore$ द्वितीय निकटन (second approximation) आहे,

$$x_2 = x_1 - \frac{f(x_1)}{f'(x_1)}$$

$$\Rightarrow \quad x_2 = 0.5 - \frac{f(0.5)}{f'(0.5)}$$

$$\Rightarrow \quad x_2 = 0.5 - \frac{0.625}{-4.25}$$

$$\Rightarrow \quad x_2 = 0.5 + 0.1471$$

$$\Rightarrow \quad \mathbf{x_2 = 0.6470}$$

आता समीकरण (i) आणि (ii) वरून,

$f(x_2) = f(0.6470) = (0.6470)^3 - 5(0.6470) + 3 = 0.0358$

$f'(x_2) = f'(0.6470) = 3(0.6470)^2 - 5 = -3.744$

∴ तिसरे निकटन (third approximation) आहे,

$x_3 = x_2 - \frac{f(x_2)}{f'(x_2)}$

$\Rightarrow \quad x_3 = 0.6470 - \frac{f(0.6470)}{f'(0.6470)}$

$\Rightarrow \quad x_3 = 0.6470 - \frac{0.0358}{-3.744}$

$\Rightarrow \quad x_3 = 0.6470 + 0.0096$

$\Rightarrow \quad \mathbf{x_3 = 0.6566}$

∴ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल $\mathbf{x = 0.6566}$ हे आहे.

**2)** न्यूटन रॅफसन पद्धत (Newton-Raphson method) वापरुन $\mathbf{x^4 - x - 9 = 0}$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. [केवळ तीन पुनरावृत्ती(three iterations) करा]

उत्तर: समजा $f(x) = x^4 - x - 9 \cdots\cdots\cdots\cdots (i)$

∴ $f'(x) = 4x^3 - 1 \cdots\cdots\cdots\cdots (ii)$

∴ $f(0) = 0 - 0 - 9 = 3 < 0$

$f(1) = 1^4 - 1 - 9 = -9 < 0$

$f(2) = 2^4 - 2 - 9 = 5 > 0$

∵ $f(1) < 0$ आणि $f(2) > 0$

∴ चाचणी आणि त्रुटी पद्धतीने( trial and error method) उकल (root) 1 आणि 2 च्या दरम्यान आहे.

प्रारंभिक अंदाजे $x_0 = 2$ असू द्या ,

इथे $f(2) = 5$ आणि $f'(x_0) = f'(2) = 4(2)^3 - 1 = 31$

∴ न्यूटन रॅफसन पद्धतीने-(Newton-Raphson method) प्रथम निकटन (first approximation) आहे,

$x_1 = x_0 - \frac{f(x_0)}{f'(x_0)}$

⟹ $x_1 = 2 - \frac{f(2)}{f'(2)}$

⟹ $x_1 = 2 - \frac{5}{31}$

⟹ $x_1 = 2 - 0.1612$

⟹ $\mathbf{x_1 = 1.8387}$

आता समीकरण (i) आणि (ii) वरून,

$f(x_1) = f(1.8387) = (1.8387)^4 - 1.8387 - 9 = 0.5912$

$f'(x_1) = f'(1.8387) = 4(1.8387)^3 - 1 = 23.8652$

∴ द्वितीय निकटन (second approximation) आहे,

$x_2 = x_1 - \frac{f(x_1)}{f'(x_1)}$

⟹ $x_2 = 1.8387 - \frac{f(1.8387)}{f'(1.8387)}$

⟹ $x_2 = 1.8387 - \frac{0.5912}{23.8652}$

⟹ $x_2 = 1.8387 - 0.0247$

⟹ $\mathbf{x_2 = 1.8139}$

आता समीकरण (i) आणि (ii) वरून,

$f(x_2) = f(1.8139) = 1.8139\ 4 - 1.8139 - 9 = 0.0117$

$f'(x_2) = f'(1.8139) = 4(1.8381)^3 - 1 = 22.8726$

∴ तिसरे निकटन (third approximation) आहे,

$x_3 = x_2 - \frac{f(x_2)}{f'(x_2)}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.8139 - \frac{f(1.8139)}{f'(1.8139)}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.8139 - \frac{0.0117}{22.8726}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.8139 - 0.0005$

$\Rightarrow \quad \mathbf{x_3 = 1.8133}$

$\therefore$ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल $\mathbf{x = 1.8133}$ हे आहे.

**3)** न्यूटन रॅफसन पद्धत (Newton-Raphson method) वापरुन $\mathbf{x^3 - x - 1 = 0}$ समीकरणाचे अंदाजे उकल शोधा. [केवळ तीन पुनरावृत्ती(three iterations) करा]

**उत्तर:** समजा $f(x) = x^3 - x - 1 \cdots\cdots\cdots (i)$

$\therefore \quad f'(x) = 3x^2 - 1 \cdots\cdots\cdots (ii)$

$\therefore \quad f(0) = 0 - 0 - 1 = -1 < 0$

$f(1) = 1^3 - 1 - 1 = -1 < 0$

$f(2) = 2^3 - 2 - 1 = 5 > 0$

$\because \quad f(1) < 0$ आणि $f(2) > 0$

$\therefore$ चाचणी आणि त्रुटी पद्धतीने( trial and error method) उकल (root) 1 आणि 2 च्या दरम्यान आहे.

प्रारंभिक अंदाजे $x_0 = 1$ असू द्या,

इथे $f(1) = -1$ आणि $f'(x_0) = f'(1) = 3(1)^2 - 1 = 2$

$\therefore$ न्यूटन रॅफसन पद्धतीने-(Newton-Raphson method) प्रथम निकटन (first approximation) आहे,

$x_1 = x_0 - \frac{f(x_0)}{f'(x_0)}$

$\Rightarrow \quad x_1 = 1 - \frac{f(1)}{f'(1)}$

$\Rightarrow \quad x_1 = 1 - \frac{-1}{2}$

$\Rightarrow \quad x_1 = 1 + 0.5$

$\Rightarrow \quad \mathbf{x_1 = 1.5}$

आता समीकरण (i) आणि (ii) वरून,

$f(x_1) = f(1.5) = 1.5^3 - 1.5 - 1 = 0.875$

$f'(x_1) = f'(1.5) = 3(1.5)^2 - 1 = 5.75$

$\therefore$ द्वितीय निकटन (second approximation) आहे,

$x_2 = x_1 - \frac{f(x_1)}{f'(x_1)}$

$\Rightarrow \quad x_2 = 1.5 - \frac{f(1.5)}{f'(1.5)}$

$\Rightarrow \quad x_2 = 1.5 - \frac{0.875}{5.75}$

$\Rightarrow \quad x_2 = 1.5 - 0.1521$

$\Rightarrow \quad \mathbf{x_2 = 1.3478}$

आता समीकरण (i) आणि (ii) वरून,

$f(x_2) = f(1.3478) = 1.3478^3 - 1.3478 - 1 = 0.1005$

$f'(x_2) = f'(1.3478) = 3(1.3478)^2 - 1 = 4.4496$

$\therefore$ तिसरे निकटन (third approximation) आहे,

$x_3 = x_2 - \frac{f(x_2)}{f'(x_2)}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.3478 - \frac{f(1.3478)}{f'(1.3478)}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.3478 - \frac{0.1005}{4.4496}$

$\Rightarrow \quad x_3 = 1.3478 - 0.0225$

$\Rightarrow \quad \mathbf{x_3 = 1.3252}$

$\therefore$ दिलेल्या समीकरणाचे अंदाजे उकल $\mathbf{x = 1.3252}$ हे आहे.

**4)** न्यूटन रॅफसन पद्धत (Newton-Raphson method) $\sqrt[3]{\mathbf{100}}$ चे अंदाजे उकल शोधा.

( केवळ तीन पुनरावृत्ती (three iterations) करा)

उत्तर: समजा $x = \sqrt[3]{100}$

$\therefore \quad x^3 = 100$

$\therefore \quad f(x) = x^3 - 100 \cdots\cdots\cdots\cdots (i)$

$\therefore \quad f'(x) = 3x^2 \cdots\cdots\cdots\cdots (ii)$

$\therefore \quad f(0) = 0 - 100 = -100 < 0$

$f(1) = 1^3 - 100 = -99 < 0$

$f(2) = 2^3 - 100 = -92 < 0$

$f(3) = 3^3 - 100 = -73 < 0$

